दि. ०३/०५/२०२३

म.टा.पू. पान क्र. १

# मिरा-भाईंदरमधील पाणीप्रश्न कायम

## मंजूर कोट्यानुसार पाणीपुरवठा करण्याकडे पाठ

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरला पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थांकडून मंजूर कोट्याच्या तुलनेत कमी पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे सर्वपक्षीयांनी आक्रमक भूमिका घेत आठवडाभरात मंजूर कोट्यानुसार पाणीपुरवठा न केल्यास आंदोलन करू, असा इशारा दिला होता. यानंतर पाणीपुरवठ्यात काही प्रमाणात वाढ करण्यात आली. मात्र हे पाणी मंजूर कोट्याच्या तुलनेत कमीच आहे. परिणामी शहरातील पाणीप्रश्न अद्याप कायम आहे.

मिरा-भाईंदरला स्टेम प्राधिकरणाकडून ८६, तर एमआयडीसीमार्फत १३५ एमएलडी पाणी मंजूर आहे. शहराची वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता, हे पाणी अपुरे आहे. असे असताना स्टेमसह एमआयडीसीकडून मागच्या काही दिवसांपासून मंजूर कोट्याच्या तुलनेत सुमारे २२ एमएलडी कमी पाणीपुरवठा केला जात होता. परिणामी पालिकेमार्फत कमी दाबाने व विलंबाने पाणीपुरवठा केला जात असल्याने ऐन उन्हाळ्यात नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत होते.

याबाबत सर्वपक्षीयांच्या मागणीनुसार गेल्या आठवड्यात बुधवारी एक बैठक पालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला महापालिका अधिकारी, सर्वपक्षीय माजी नगरसेवक, आमदार गीता जैन, स्टेम व एमआयडीसी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा केल्यानंतर सर्वपक्षीयांनी आठवडाभरात मंजूर कोट्यानुसार पाणीपुरवठा करा, अशी मागणी केली. अन्यथा आंदोलन करू, असा इशारा दिला. त्यानंतर मागच्या आठवडाभरात बैठकीतील मागणीनुसार स्टेमने चेना येथील मीटरनुसार पाणी मोजण्यास सुरुवात केली. तसेच पूर्वीच्या तुलनेत अधिक म्हणजेच सुमारे ७७ एमएलडी, तर एमआयडीसीने ११५ एमएलडी पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली. मात्र हा पाणीपुरवठा मंजूर कोट्याच्या तुलनेत अद्याप कमीच आहे. परिणामी शहरातील पाणीपुरवठा सध्या ३५ तासांवर आला असला, तरी अद्याप काही प्रमाणात पाण्याची आवश्यकता असल्याचे मत महापालिकेने व्यक्त केले.



### शेवटच्या दोन दिवसांची मुदत

मागील आठवड्यात पार पडलेल्या बैठकीत स्टेमच्या अधिकाऱ्यांनी मंजूर कोट्यानुसार पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्यानुसार अद्याप पाणीपुरवठा केला जात नसल्याने शेवटची दोन दिवसांची मुदत दिली जाणार आहे. त्यानंतर पुढील भूमिका घेतली जाईल, अशी माहिती भाजपच्या ध्रुवकिशोर पाटील व प्रशांत दळवी यांनी दिली. तर आमदार गीता जैन यांनी हा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली जाणार असल्याचे सांगितले. काँग्रेस व शिवसेनेची भूमिका कळू शकली नाही.

# पोलिसांनी अडवल्याने दुचाकीस्वाराने गाडी पेटवली

## कागदपत्रे नसल्याने तरुणाचा प्रताप

म. टा. वृत्तसेवा, वसई

वाहतूक पोलिसांनी गाडीची कागदपत्रे आणि परवाना तपासण्यासाठी गाडी अडवली. मात्र कागदपत्रांची विचारपूस केल्यानंतर कागदपत्रे नसल्याने दुचाकीस्वाराने चक्क गाडीला आग लावल्याची घटना वसईत पूर्वेला घडली. या घटनेत आग लावलेल्या दुचाकीची आग तत्काळ विझविल्याने मोठी दुर्घटना टळली.

भानूप्रसाद पांडे हा तरुण दुचाकीवरून वसई पूर्वेकडील रेंज ऑफिस परिसरात जात होता. गोखिवरे येथे गाडी पोहोचली असता वाहतूक पोलिस सचिन मोहने यांनी त्याला अडवले. दुचाकीची कागदपत्रे विचारली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे देत कागदपत्रे नसल्याचे सांगितले. यासह दुचाकीचा विमा, पीयूसीदेखील त्याच्याकडे नव्हती. नंबर प्लेट फॅन्सी होती. त्यामुळे कारवाई होणार, या भीतीने पोलिसांवर दबाव आणण्याचा प्रयत्न या तरुणाने केला. मात्र पोलिसांनी कारवाई सुरूच ठेवल्याने अखेर या तरुणाने संतापून त्याच्याच खिशातील काडीपेटी काढून दुचाकीला आग लावली. पोलिसांनी रेतीच्या साहाय्याने आग विझवली. या प्रकरणी वालिव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तरुणाला अटक केली आहे.

Scanned with CamScanner

सकाळ पू. पान क्र.3

दि. 03/04/2023

## वाहतूक पोलिसांच्या कारवाईला विरारमध्ये केराची टोपली

विरार, ता. ३ (बातमीदार) : विरार-मनवेलपाडा येथील खासगी बसच्या अवैध पार्किंगविरोधात वाहतूक पोलिसांनी केलेल्या कारवाईत १ जानेवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत तब्बल ७३ हजार ५०० रुपये दंड ठोठावलेला आहे. ८१ प्रकरणांत हा दंड ठोठावण्यात आला असल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.

विरार-मनवेल पाडा येथील खासगी बस पार्किंगचा प्रश्न कायम आहे. पालिका व वाहतूक पोलिसांच्या त्रोटक कारवाईनंतर बस पुन्हा रस्त्यावरच आणून उभ्या करण्यात येत असल्याने आता दाद तरी मागायची कुणाकडे? असा प्रश्न परिसरातील नागरिकांना पडला आहे. वसई-विरार शहरात सर्वत्र मोठ्या प्रमाणात खासगी बस, टँकर, चारचाकी गाड्या, खासगी टुरिस्ट कंपन्यांच्या गाड्या, बेवारस वाहने इत्यादी रस्त्याच्या कडेला व इतरत्र बेकायदा पार्किंग करण्यात येत असल्याने या रस्त्यांवर नेहमी वाहतूक कोंडी होऊन सर्वसामान्य नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळ नसल्याने शहरात ठिकठिकाणी गाड्या पार्क केल्या जातात. बेवारस वाहनांची संख्यादेखील अधिक आहे. या बेवारस गाड्या जागा मिळेल तिथे उभ्या करून ठेवल्या जातात.

लोकमत पू. पान क्र.1

## तृतीयपंथी दलालास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मॉडेलिंग करणाऱ्या तरुणींचे व्हॉट्सअ‍ॅपद्वारे फोटो पाठवून त्यांना वेश्या व्यवसायासाठी पुरवणाऱ्या तृतीयपंथी दलालास मीरा रोडमधून अटक करण्यात आली आहे.

मीरा भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षचे पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळालेल्या माहितीनुसार, तृतीयपंथी महिला वेश्या दलाल नितु ऊर्फ संजना सिंह (रा. अंधेरी, मुंबई) ही फोटोशूट व मॉडेलिंग करणाऱ्या तरुणींची छायाचित्रे पुरुष गिऱ्हाईकांशी संपर्क साधून ती व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवते. मुंबई व मीरा भाईंदर परिसरातील ग्राहकांना लॉजमध्ये खोली बुक करायला लावून पैशांच्या मोबदल्यात वेश्या व्यवसायसाठी तरुणी पाठवत असल्याने पोलिसांनी बोगस गिऱ्हाईकामार्फत तिच्याशी संपर्क केला. नितु सिंह हिच्यासाठी वर्धमान फॅन्टसीसमोर सापळा रचला. तिला ताब्यात घेऊन. तिच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर एका पीडित तरुणीची सुटका केली.

लोकमत पू. पान क्र.3

## लेझर काम होणाऱ्या दुकानात आग

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडच्या निवासी इमारतीतील दुकानात मंगळवारी दुपारी मोठी आग लागल्याने रहिवासी भयभीत झाले. आग इतकी भडकलेली होती की, धुराचे लोट उंच उसळल्याने लोक घाबरून घरातून बाहेर पडले.

मीरा रोडच्या बेव्हर्ली पार्क भागात पालिका पाण्याच्या टाकीसमोरच मुकुंद रितू नावाची इमारत आहे. या इमारतीच्या दुकानात लेझरद्वारे अ‍ॅक्रिलिक आदींवर डिझाइन बनविण्याचे काम केले जात असल्याने, त्याचा त्रास होत असल्याची तक्रार रहिवाशांनी गेल्या वर्षी केली होती. दरम्यान, मंगळवारी दुपारी या दुकानात भीषण आग लागली. कनकिया व भाईंदर येथील पालिका अग्निशमन केंद्रातील वाहनांनी येऊन आग आटोक्यात आणली. दरम्यान, या दुकानात लेझरद्वारे घातक काम केले जात असल्याची तक्रार महापालिकेस करूनही कारवाई न झाल्याचा आरोप करत रहिवासी प्रीती पाठक यांनी संताप व्यक्त केला.

लोकमत पान क्र. 7

# तुमचा आवाज वापरून होत आहे फसवणूक; सावध व्हा!

**लोकमत न्यूज नेटवर्क ।** माहिती तंत्रज्ञानाच्या युगात एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता हा जणू परवलीचा शब्द बनला आहे. अशातच एआय व्हॉइस स्कॅम हा फसवणुकीचा नवा प्रकार एका सर्वेक्षणातून समोर आला आहे. देशातील सुमारे निम्म्या प्रौढांनी एआय व्हॉइस स्कॅमचा फटका खाल्ला आहे किंवा त्यांच्या जवळच्या कुणाचीतरी या मार्गाने फसवणूक झालेली आहे.

फसवणुकीचा हा प्रकार सर्वत्र फोफावत असला तरी भारतात यामुळे पीडित असलेल्यांचे प्रमाण जगभरातील एकूण पीडितांच्या तब्बल दुप्पट आहे. यामुळे एआयपासून लोकांना अधिक सावधानता बाळगावी लागणार आहे.

### बहुतांश यूझर्स बेसावध

**६९%** लोकांना आजच्या घडीला त्यांचा खरा आवाज आणि एआय आवाज यात काही फरक असतो हेच ठाऊक नाही. ते या दोन्ही आवाजातील फरक ओळखू शकत नाहीत.

**६६%** लोक एखादा मित्र वा जवळच्या व्यक्तीकडून व्हॉइस मेसेज वा व्हॉइस नोट आली तरी उत्तर देण्यास तयार झाले. समोरच्या व्यक्तीने संकटाचे कारण सांगितल्याने त्यांना याचा संशय आला नाही. या लोकांनी प्रसंगी पैसे पाठवण्याचीही तयारी दाखविली.



### केवळ ३ सेकंदांचा आवाज पुरेसा

ऑनलाइन फसवणूक करताना एआयचा वापर कसा मोठ्या प्रमाणात वाढला आहे, याबाबत मॅकॅफी या संस्थेने सर्वेक्षण केले. हा मुद्दा खूप गंभीर असल्याचे लक्षात आले. कारण एखाद्या व्यक्तीच्या आवाजाप्रमाणे हुबेहूब आवाज तयार करावयाचा असेल ३ सेकंदांचा आवाज पुरेसा होतो. या डुप्लीकेट आवाजाच्या मदतीने संबंधित व्यक्तीला गंडा घातला जाऊ शकतो.



**१२%** प्रकरणांमध्ये मुला-मुली कडून मेसेज आल्याचा समज झाला.

**४६%** यूझर्स पालकांचा मेसेज समजून मदतीसाठी तयार झाले.

**३४%** यूझर्स प्रियकर वा प्रेयसीचा मेसेज समजून धावले.

### कोणती कारणे सांगितली?

७०% मेसेज लुबाडणुकीचे कारण

६९% प्रकरणांत कारला अपघाताचे कारण

६५% पाकीट मारले किंवा हरवले

६२% परदेशी प्रवासात मदतीसाठी

Scanned with CamScanner

दि. ०३/०५/२०२३

लोकसत्ता पू. पान क्र.4

# हत्या प्रकरणातील फरार आरोपीला १४ वर्षांनंतर अटक

## माणिकपूर पोलिसांची कारवाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मालकाची हत्या करून फरार झालेल्या एका आरोपीला माणिकपूर पोलिसांनी १४ वर्षांनंतर अटक केली आहे. आपली ओळख लपवून तो पोलिसांना चकवा देत होता.

वसईत फॅब्रिकेशनचा कारखाना चालविणारे पांधरी राजभर यांची १५ सप्टेंबर २००९ रोजी हत्या करण्यात आली होती. राजभर यांचा मृतदेह मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत आढळून आला होता. याप्रकरणी माणिकपूर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली होती. मात्र, मुख्य आरोपी संजय भारद्वाज (वय ३९) हा फरार होता. तो सापडत नसल्याने पोलिसांनी त्याला फरार घोषित केले होते. मात्र, माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने नव्याने या प्रकरणाचा तपास करून मुंबईतील चकाला येथून भारद्वाज याला अटक केली.

भारद्वाज हा १४ वर्षांपूर्वी राजभर यांच्या कारखान्यात काम करत होता. भारद्वाज याने राजभर यांच्याकडे पाच हजार रुपये आगाऊ रक्कम मागितली होती. ती राजभर यांनी दिली नव्हती. त्यामुळे भारद्वाज याने दोन मित्रांच्या मदतीने त्यांची हत्या केली. पोलिसांना चकवा देण्यासाठी तो विविध ठिकाणी ओळख बदलून काम करत होता.

पोलीस आपल्याला कधीच पकडू शकणार नाही, असे त्याला वाटत होते. मात्र, पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण करून त्याचा माग काढून अटक केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे साहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

लोकसत्ता पू. पान क्र. 1

सामना पान क्र.7

# फुकटची केळी पडली महागात

## दिव्यांग फेरीवाल्यास मारहाण करणारा अटकेत

भाईंदर, दि. २ (सा.वा.) – फुकटच्या केळ्यांसाठी दिव्यांग फेरीवाल्याला मारहाण करणे एकाला चांगलेच महागात पडले आहे. दिव्यांग फेरीवाला रस्त्यावरून जात असताना जेसन डिसुझा याने त्याला हटकले आणि गाडीवरील केळी घेतली. मात्र फेरीवाल्याने एक केळी घे असे सांगताच संतापलेल्या तरुणाने फेरीवाल्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. भाईंदर पोलिसांनी जेसनला बेड्या ठोकल्या.

नेहरूनगर येथे राहणारे सद्दाम हुसैन हे दिव्यांग असून उपजीविकेसाठी हातगाडीवर केळी विकण्याचा धंदा करतात. सद्दाम हे सोमवारी फाटक मार्गावर हातगाडीवर केळी ठेवून विक्रीसाठी फिरत होते. यावेळी जेसन याने गाडीवरील चार केळी सद्दाम यांना न विचारता घेतली. केळ खायचे आहे तर एक घे चार नको घेऊ असे त्यांनी सांगितले. याचा राग आलेल्या जेसनने सद्दाम याला बेदम मारहाण केली. तसेच त्यांना रस्त्यावर ढकलून दिले. यावेळी स्थानिकांनी सद्दाम यांना जेसनच्या तावडीतून सोडवले. यादरम्यान सद्दाम यांच्या खिशातील ३ हजार रुपये गहाळ झाले. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

## नोकरच चोर

नालासोपारा – घरातील नोकराने मोबाईल फोन व बँकेच्या अकाऊंटवरून पैसे काढून चोरी केल्याची घटना नायगाव येथे घडली आहे. नायगाव पूर्व येथे सरजित विश्वास (३४) याच्या घरी आझरुद्दीन अली या नोकराने त्यांचे दोन्ही मोबाईल फोन, रोख रक्कम चोरून त्यांच्या मोबाईलमध्ये असलेल्या कोटक बँकेच्या एटीएम व गुगल पेमधून ८७ हजार रुपये लंपास केले. याबाबत नायगाव पोलीस ठाण्यात नोकराविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ऑनलाईन गंडा

विरार – क्रिप्टो करन्सीत पैसे भरून एका तरुणीची लाखोंची फसवणूक करण्यात आल्याची घटना विरारमध्ये घडली आहे. फुलपाडा रोड येथील भाविका चौधरी (२४) या तरुणीला एका अनोळखी व्यक्तीने क्रिप्टो करन्सीमध्ये पैसे भरल्यास अधिक नफा मिळेल, असे आमिष दाखवले होते. त्यानंतर तरुणीने १ लाख ७६ हजार ७९० रुपये त्यात गुंतवले. मात्र परत पैसे न मिळाल्याने या तरुणीने विरार पोलीस ठाण्यात धाव घेत अज्ञात आरोपीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

# मीरा-भाईंदर शहरात १४ इमारती अतिधोकादायक

**लोकसत्ता वार्ताहर**



**भाईंदर :** जुन्या इमारती कोसळून दुर्घटना घडू नये, म्हणून महापालिकेने वीस वर्षांहून अधिक जुन्या गृहसंकुलांना इमारतींचा रचनात्मक अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार शहरात १४ इमारती या अतिधोकादायक स्थितीत आल्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शहरातील जुन्या इमारतींच्या सुरक्षेबाबतचा आढावा घेण्याच्या सूचना पालिका आयुक्त दिलीप ढोले यांसकडून देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत ४२९ इमारतींची परिस्थिती चिंताजनक असल्याची बाब समोर आली आहे. नियमानुसार प्रशासनाने या इमारतींना सी १ (अतिधोकादायक), सी २-ए (इमारत रिकामी करून दुरुस्ती करणे), सी २-बी (इमारत रिकामी न करता दुरुस्ती करणे) आणि सी ३ (किरकोळ दुरुस्ती ) अशा वर्गवारीत विभागले आहेत.

यात १४ इमारती या अतिधोकादायक स्थितीत आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत यावर उचित निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती उपायुक्त मारुती गायकवाड यांनी दिली.

**धोकादायक इमारतींचा तपशील**

| प्रभाग क्र. | सी १ | सी २(ए) | सी २(बी) | सी २(सी) | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ | ०७ | ३५ | ०४ | ४७ |
| २ | ०४ | ०२ | ४५ | ०१ | ५२ |
| ३ | ०५ | ०४ | ५३ | ०५ | ६७ |
| ४ | ०० | ०३ | ३८ | ०१ | ४२ |
| ५ | ०० | ०१ | १९० | ०१ | १९२ |
| ६ | ०४ | ०२ | २२ | ०१ | २९ |
| एकूण | १४ | १९ | ३८२ | १३ | ४२९ |

Scanned with CamScanner

दि. 03/05/2023

लोकसत्ता पान क्र. 5

# सत्तेत आल्यास बजरंग दल, पीएफआयवर बंदी

## कर्नाटकमध्ये काँग्रेसचे जाहीरनाम्यात आश्वासन

**पीटीआय, बंगळूरु**

**विविध समुदायांत** जाती-धर्मांच्या आधारावर द्वेष निर्माण केल्यास बजरंग दल आणि पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियावर कारवाई केली जाईल, असे आश्वासन काँग्रेसने कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनाम्यात दिले आहे. अशा संघटनांवर बंदी आणली जाईल, असे आश्वासन काँग्रेसने दिले आहे.

सत्तेत आल्यावर भाजप सरकारने केलेले जनविरोधी कायदे एक वर्षात रद्द करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष डी.के.शिवकुमार तसेच विधिमंडळ पक्षनेते सिद्धरामय्या यांच्या उपस्थितीत जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. गृह ज्योती, गृह लक्ष्मी, अन्न भाग्य, युवा निधी तसेच शक्ती यांची हमी यामध्ये देण्यात आली आहे. यात शक्ती योजनेत सरकारी महामंडळाच्या बसेसमध्ये महिलांना राज्यभर मोफत प्रवास असेल असे खरगे यांनी स्पष्ट केले. गृहलक्ष्मी योजनेत महिला कुटुंबप्रमुखाला प्रति महिना दोन हजार रुपये दिले जातील. गृह ज्योती योजनेत २०० युनिटपर्यंत मोफत विजेचे आश्वासन आहे. अन्न भाग्य योजनेत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला १० किलो अन्नधान्य मिळेल. युवा निधी योजनेत पदवीधर बेरोजगार युवकाला तीन हजार तर १८ ते २५ वयोगटातील पदविकाधारक बेरोजगाराला पंधराशे रुपये दिले जातील, वेगळे शैक्षणिक धोरण असेल, असे पक्षाने स्पष्ट केले.






### विहिंपची टीका

बजरंग दलावर बंदीचे आश्वासन काँग्रेसने जाहीरनाम्यात दिले आहे. त्यावर विश्व हिंदू परिषदेने टीका केली आहे. राष्ट्रवादी संघटनांना बदनाम करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप विहिंपचे नेते सुरेंद्र जैन यांनी केला आहे.

### मोदी फक्त स्वतःबद्दल बोलतात - राहुल गांधी

**तीर्थहळ्ळी ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी कर्नाटकच्या विधानसभा निवडणुकीतही फक्त स्वतःबद्दलच बोलतात अशी टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली. मोदी कर्नाटकमधील भ्रष्टाचारावर का बोलत नाहीत. ते मुख्यमंत्री बोम्मई, बी एस येडियुरप्पा यांचे नाव का घेत नाहीत असा प्रश्न राहुल यांनी विचारला.

### डी. के. शिवकुमार यांच्या हेलिकॉप्टरला अपघात

**बंगळूरु ।** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार मंगळवारी हेलिकॉप्टर अपघातातून थोडक्यात बचावले. ते प्रचारासाठी कोलार जिल्ह्यात जात असताना पतंग धडकल्यामुळे कॉकपिटची काच फुटली. हेलिकॉप्टर 'एचएएल'च्या तळावर आपत्कालीन परिस्थितीत उतरवण्यात आले.

## काँग्रेसला हनुमानभक्तांना कोठडीत टाकायचे आहे !

### मोदी यांची टीका

**पीटीआय, होस्पेट**



**काँग्रेसने त्यांच्या** जाहीरनाम्यात 'बजरंग दला'वर बंदी घालण्याचे आश्वासन दिल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर टीका केली. काँग्रेसने आधी प्रभू रामाला बंदिस्त केले आता त्यांना हनुमानाची पूजा करणाऱ्यांना कोठडीत टाकायचे आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

मल्लिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखालील संघटनेने १० मे रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर काही तासांतच मोदींनी काँग्रेसवर हल्ला चढविला. विजयनगर जिल्ह्यात एका निवडणूक रॅलीला संबोधित करताना मोदी म्हणाले, ''मी हनुमानाच्या भूमीवर आलो आहे. मी भाग्यवान आहे की मला हनुमानाच्या भूमीला नमस्कार करण्याची संधी मिळाली. मात्र मी हनुमानाच्या भूमीला वंदन करायला आलो आणि त्याचवेळी काँग्रेसने हनुमानाला कुलूपबंद करण्याचा निर्णय घेतला, हे दुर्दैव आहे,'' असे मोदी म्हणाले. काँग्रेसला प्रभू श्रीरामाची अडचण होती आणि आता 'जय बजरंग बली' म्हणणाऱ्या लोकांची अडचण आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

### 'दहशतवाद्यांच्या तुष्टीकरणाचा काँग्रेसचा इतिहास'

**चित्रदुर्ग ।** दहशतवाद तसेच दहशतवाद्यांच्या तुष्टीकरणाचा काँग्रेसचा इतिहास असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. काँग्रेस पक्षाने यापूर्वी देशाच्या संरक्षण दलाबाबत तसेच लक्ष्यभेदी हल्ल्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचा उल्लेख पंतप्रधानांनी येथील सभेत केला.

### मोदींनी हनुमान भक्तांची माफी मागावी -खेरा

**नवी दिल्ली ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दैवत हनुमानाची तुलना बजरंग दल या संघटनेशी करून भाविकांच्या भावना दुखावल्या आहेत, असा आरोप काँग्रेसने मंगळवारी केला. याबद्दल मोदींनी माफी मागावी, असे काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी म्हटले आहे.

Scanned with CamScanner

दि. ०३/०४/२०२३

पुण्यनगरी पृ. पान क्र. १

# लग्नमंडपांची अग्निसुरक्षा धोक्यात

## महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये संताप

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात गल्लोगल्ली अनधिकृत लग्नमंडपे थाटलेली दिसत आहेत. अनेकांनी खासगी जागेत तर काहींनी सरकारी जागेतही लग्नमंडप उभारली असून, नागरिकांकडून भाडे स्वरूपात लाखोंची वसुली केली जात आहे. अनेक लग्नमंडप चालवणाऱ्यांनी अग्निशमन विभागाचा परवाना घेतला नसल्याचे सांगितले जाते. यामुळे लग्नमंडपाची अग्निसुरक्षा धोक्यात आली आहे. भविष्यात आगीची मोठी दुर्घटना घडून नागरिकांच्या जीवास धोका निर्माण होऊ शकतो. महापालिका प्रशासन कारवाई न करता याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.



मीरा-भाईंदर शहरात अनेक जागामालकांनी मोकळ्या जागेत लग्न व विविध कार्यक्रमांसाठी लाकडी बांबूने मंडप व आजूबाजूला पडदे लावून हॉल सुरू केले आहेत. बहुतांश हॉलमालकांनी महापालिकेची तसेच अग्निशमन विभागाची कोणतीही परवानगी घेतलेली नसल्याचे समजते. अनेकांना अग्निशमन विभाग फक्त नोटिसा देते. त्यापुढे कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. असेच काशीगाव येथील मुरलीधर हॉल बेकायदा सरकारी जागेवर उभारला आहे. या लग्नमंडपाच्या अग्निसुरक्षेसाठी चार वेळेस फक्त नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यापुढे कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. तेथे नेहमीच मोठ्या प्रमाणात कार्यक्रम सुरू असतात. तेथे कोणत्याही प्रकारची अग्निसुरक्षा व्यवस्था केलेली नसल्यामुळे भविष्यात एखादी आग लागण्याची दुर्घटना घडून जीवित किंवा वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

● महापालिका प्रशासन कारवाई करत नसून, नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. अशाच प्रकारे मीरा-भाईंदर शहरात अनेक लग्नमंडप उभारली आहेत. याकडे महापालिका प्रशासनाने लक्ष देऊन कारवाई करणे गरजेचे आहे. झोपलेल्या महापालिका प्रशासनाला एखादी दुर्घटना घडल्यानंतर जाग येणार का, असा सवालही विचारला जात आहे.

पुढारी पृ. पान क्र. १

# पालिकेची मयुरी बारवर तोडक कारवाई

## दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली केले एक मजल्याचे अनधिकृत वाढीव बांधकाम

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने मंगळवारी भाईंदर पूर्वेकडील गोडदेव नाक्यावर असलेल्या मयुरी बारवर (पूर्वाश्रमीचे श्रीकृष्ण भवन) तोडक कारवाई केली. पालिकेने या बारला दुरुस्तीची परवानगी दिली असता त्याचा गैरफायदा घेत बार चालकाने त्यावर एक मजल्याचे अनधिकृत वाढीव बांधकाम केले होते.

पालिकेकडून यापूर्वी हा बार अनधिकृत असल्याचे घोषित करीत त्यावर तोडक कारवाई केली होती. याविरोधात बार चालकाने जिल्हा न्यायालयातून स्थगिती आदेश मिळविला. असे असतानाही प्रभाग समिती कार्यालय क्रमांक ३ मार्फत बारला दुरुस्तीची परवानगी देण्यात आली. त्याचा गैरफायदा घेत बार




चालकाने बारची दुरुस्ती न करता थेट पहिल्या मजल्याचे अनधिकृत वाढीव बांधकाम केले. याविरोधात अनेकांनी आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे तक्रारी करीत कारवाई करण्याची मागणी केली. त्याची दखल घेत आयुक्तांनी अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाला बारवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार विभागाने मंगळवारी बारवर तोडक कारवाई केली. हा बार येथील अभिनव शाळेजवळच आहे. असे अनेक बार शहरातील ठिकठिकाणच्या शाळांजवळ आहेत. तसेच तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणारी दुकाने देखील शाळेला लागूनच सुरु करण्यात आली आहेत. कोणत्याही शैक्षणिक संस्थेपासून सुमारे १०० मीटर अंतराच्या आत बार, तंबाखूजन्य पदार्थाच्या विक्रीला सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरणाचे नियमन) अधिनियम २००३ मधील कलम ६ अन्वये मनाई करण्यात आली आहे. अशाप्रकारची अनेक दुकाने व बार ठिकठिकाणच्या शाळांजवळ खुलेआम सुरु असताना पोलीस व अन्न व औषध प्रशासनाने गांधारीची भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.


Scanned with CamScanner

पुढारी पू.पान क्र.3

दि.03/04/2023

# खाद्यपदार्थांसाठी व्यावसायिकऐवजी घरगुती गॅस सिलिंडर

## व्यावसायिक गॅस सिलिंडरचा दर वाढल्याने खुलेआम घरगुती गॅस सिलिंडरचा बेकायदेशीर वापर

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर शहरात बेकायदेशीर व्यवसायाच्या घटना काही नवीन नाहीत. उघड्यावर खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी संभाव्य दुर्घटना टाळण्याच्या अनुषंगाने त्यांना गॅस सिलिंडरचा वापर करण्यास बंदी घालण्यात आल्याचे बोलले जात आहे. यानंतरही उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे गॅस सिलेंडरचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास येत आहे. अशातच व्यावसायिक गॅस सिलिंडरचा दर वाढल्याने खुलेआम घरगुती गॅस सिलिंडरचा बेकायदेशीर वापर केला जात असल्याचे निदर्शनास आहे. यामुळे ऐन उन्हाळ्यात वाढणाऱ्या तापमानामुळे उघड्यावरील सिलेंडरचा स्फोट होण्याचा संभाव्य धोका देखील वाढल्याचे स्पष्ट झाल्याने उघड्यावर गॅस सिलिंडरचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उघड्यावर खाद्यपदार्थ विक्रीस मनाई करण्यात आली असताना



शहरात खुलेआम खाद्यपदार्थांच्या हातगाड्या वा ठेले लावण्यात येत आहेत. यावर तयार केल्या जाणाऱ्या

खाद्यपदार्थांसाठी व्यावसायिक गॅस सिलिंडरचा वापर केला जातो. उघड्यावर खाद्यपदार्थ तयार करण्यासह गॅस सिलेंडर वापरण्यास मनाई करण्यात आली असतानाही खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांकडून गॅस सिलेंडरचा खु-लेआम वापर केला जात आहे. गतवर्षी भाईंदर पूर्वेकडील नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करण्याच्या ठिकाणी सिलेंडरचा स्फोट झाल्याची घटना घडली होती. सुदैवाने त्यात कोणीही जखमी झाले नाही. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतरही शहरात उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री होत असलेल्या ठिकाणी गॅस सिलेंडरचा वापर होताना दिसून येत आहे. यासाठी व्यावसायिक गॅस सिलिंडरचा वापर होत असला तरी या सिलेंडरच्या दरात मोठी वाढ झाल्याने तो परवडेनासा झाला आहे. त्याला पर्याय म्हणून थेट घरगुती सिलिंडरचा बेकायदेशीर वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

### पोलीस, अन्न व औषध प्रशासनाचे लक्ष नसल्याचा आरोप

या घरगुती गॅस सिलेंडरचा वापर खुलेआम होत असून त्यावर पोलीस व अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) लक्ष नसल्याचा आरोप केला जात आहे. एरव्ही पालिकेकडून बेकायदेशीर फेरीवाल्यांवर कारवाई केली जाते तर अशा ज्वलनशील वस्तूंचा उघडयावर बेकायदेशीर वापर करून लोकांना धोका निर्माण करणाऱ्यांविरोधात देखील कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होऊ लागली आहे. त्यातच व्यावसायिक गॅस सिलेंडर परवडत नसल्याने घरगुती गॅस सिलेंडरचा व्यवसायासाठी बेकायदेशीर वापर करणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची देखील मागणी होऊ लागली आहे.

Scanned with CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-318 मुंबई, बुधवार 3 मई 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# 14 साल से हत्या मामले में वांछित मुख्य आरोपी गिरफ्तार

**वसई:** हत्या के मामले में 14 साल से वांछित मुख्य आरोपी को माणिकपूर पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन की टीम ने गिरफ्तार कर लिया गया है।यह कार्रवाई परिमंडल 2 डीसीपी पौर्णिमा चौगुले-श्रींगी व एसीपी पद्मजा बडे के मार्गदर्शन में माणिकपुर थाने के सीनियर




पी.आई संपतराव पाटील, पी.आई (क्राइम ) अभिजीत मडके के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन के स.पो.नि.सचिन सानप की टीम ने की है।

यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस अधिकारी ने बताया कि 15 सितंबर 2010 को 09.45 बजे के पूर्व आरोपी ने अज्ञात कारण वश अज्ञात शख्स की गला दबाकर हत्या कर दी,उसके दोनों हाथ बांध दिए गए थे और सबूत मिटाने की नीयत से शव को फेंक दिया गया था,इस मामले में शिकायतकर्ता सुनिल सोपान पालवे की शिकायत पर माणिकपुर थाने में अज्ञात आरोपी के ऊपर 302, 201,34 के तहत केस दर्ज किया गया था। उक्त अपराध की विवेचना के दौरान मृतक शख्स का नाम पांधारी शामु राजभर (25), निवासी, खैरपाडा, वालीव, वसई पुर्व के रूप में हुआ। प्राप्त सूचना के आधार पर उपरोक्त अपराधों में मानिकपुर थाना के अभिलेखों पर वांछित आरोपी संजय गामा भारव्दाज (39), निवासी- जे.बी.नगर,चकाला,अंधेरी पुर्व, मुंबई से हिरासत में लिया,पता चला है कि वह पिछले 14 सालों से बनारस, उत्तर प्रदेश और अंधेरी, मुंबई में छुपा रहा है।

Scanned with CamScanner



# किन्नर द्वारा चलाए जा रहे सेक्स रैकेट का भंडाफोड़

**प्रातःकाल संवाददाता**

**मुंबई।** मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत ह्यूमन ट्रैफिकिंग ब्रांच ने युवतियों से वेश्यावृत्ति कराने वाले किन्नर दलाल को गिरफ्तार किया है। बताया जा रहा है कि आरोपी किन्नर मॉडल युवतियों को फोटोशूट करने के बहाने वेश्यावृत्ति के गंदे धंधे में धकेल दिया करती थी। पिछले कई दिनों से एक किन्नर दलाल को ह्यूमन ट्रैफिकिंग ब्रांच तलाश कर रही थी।

इसी दौरान ब्रांच को गुप्त सूचना मिली की किन्नर ने एक युवती को मॉडलिंग फोटोशूट के बहाने सोशल नेटवर्किंग साइट्स पर फोटो अपलोड करके ग्राहकों को फंसाकर देहव्यापार करवाती है। इस बात का फायदा उठाकर ह्यूमन ट्रैफिकिंग ब्रांच की टीम ने बोगस ग्राहक का सहारा लेकर जाल बिछाया।

पुलिस ने बिछायी गयी जाल में किन्नर दलाल फंस गया। पुलिस ने बोगस ग्राहक से और तय रकम लेते हुए रंगेहाथों मीरारोड से गिरफ्तार किया है। उसके बाद पुलिस ने किन्नर की चुंगुल में फंसी पीड़ित युवती को छुड़ाया। फिलहाल पुलिस ने दलाल किन्नर नितु उर्फ संजना सिंह के खिलाफ कई धाराओं के तहत मामला दर्ज कर आगे की जांच पड़ताल में जुट गयी है।

## वानखे
## यशस्वी,



मुंबई इंडियंस के खिलाफ रविवार को

Scanned with CamScanner

लोकमत

# खुनाच्या गुन्ह्यातील १४ वर्षांपासून फरार मुख्य आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : हत्या करून १४ वर्षांपासून फरार असलेल्या मुख्य आरोपीला माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांनी मुंबईच्या अंधेरी येथून सोमवारी अटक केली आहे. पुढील तपास सुरू असल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी मंगळवारी दिली.

१५ सप्टेंबर २०१० साली खैरपाडा येथील ताई पाटील चाळीत राहणाऱ्या पांधारी शामू राजभर (वय २५) याचा गळा आवळून खून करण्यात आला होता. आरोपींनी त्याचे दोन्ही हात बांधून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह फेकून दिला होता. त्यावेळी माणिकपूर पोलिसांनी हत्या, हत्येचा पुरावा नष्ट करणे या कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. वरिष्ठांनी गुन्ह्यांतील पाहिजे व फरारी आरोपी यांची विशेष शोधमोहीम राबवून त्यांच्या ठावठिकाणाबाबत माहिती घेऊन त्यांना अटक करण्याबाबतच्या सूचना व मार्गदर्शन केले होते.



हत्या करून १४ वर्षांपासून फरार असलेल्या मुख्य आरोपीला माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांनी अंधेरी येथून सोमवारी अटक केली आहे.

या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे व गुप्त बातमीदारांकडून प्राप्त माहितीच्या आधारे फरार आरोपी संजय गामा भारद्वाज (वय ३९) याला अंधेरी येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक तपास केला असता मयत इसमाने आरोपीस ५ हजार रुपये ॲडव्हान्स न दिल्याचा रागातून आरोपीने त्याच्या साथीदारांसह त्याला कारमध्ये बसवून रुमालाने गळा आवळून त्याचा खुन केला. त्यानंतर रुमालाने मयताचे हात पाठीमागे बांधून त्यास ससूनवघर गावच्या हद्दीत मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मातीच्या ढिगाऱ्याजवळ फेकून दिले होते. यानंतर आरोपी १४ वर्षांपासून बनारस, उत्तर प्रदेश व अंधेरी येथे आपले अस्तित्व लपवून राहात असल्याचे निष्पन्न झाले.

ही कारवाई पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संपतराव पाटील, पोलिस निरीक्षक (गुन्हे) अभिजित मडके, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक सचिन सानप, उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, हवालदार शैलेश पाटील, धनंजय चौधरी, शामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण व प्रवीण कांदे यांनी केली.

Hello Vasai
Page No. 4 May 03, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

दैनिक
# मुंबई केसरी टाइम्स
R.N.I.NO MAHHIN/2008/25162
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १६ अंक : 03 बुधवार ०३ मई २०२३ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/249/2023/2025 पृष्ठ : 04

## ५००० रुपये एडवांस नहीं दिया,आरोपी ने शख्स की डाली हत्या, गिरफ्तार

**वसई ;** हत्या के मामले में १४ साल से वांछित मुख्य आरोपी को माणिकपूर पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन की टीम ने गिरफ्तार कर लिया गया है।यह कार्रवाई परिमंडल २ डीसीपी पौर्णिमा चौगुले-श्रींगी व एसीपी पद्मजा बडे के मार्गदर्शन में माणिकपुर थाने के सीनियर पी.आई संपतराव पाटील, पी.आई (क्राइम ) अभिजीत मडके के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन के स.पो.नि.सचिन सानप की टीम ने की है।

यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस अधिकारी ने बताया कि १५ सितंबर २०१० को ०९.४५ बजे के पूर्व अज्ञात आरोपी ने अज्ञात कारणवश अज्ञात शख्स की गला दबाकर हत्या कर दी.उसके दोनों हाथ बांध दिए गए थे और सबूत मिटाने की नीयत से शव को फेंक दिया गया था.इस मामले में शिकायतकर्ता सुनिल सोपान पालवे की शिकायत पर माणिकपुर थाने में अज्ञात आरोपी के ऊपर ३०२,२०१,३४ के तहत केस दर्ज किया गया था।उक्त अपराध की विवेचना के दौरान मृतक शख्स का नाम पांधारी शामु राजभर (२५),निवासी-ताई पाटील चाल,खैरपाडा,वालीव, वसई पुर्व के रूप में हुआ।पुलिस ने बताया कि वरिष्ठजनों द्वारा थाने में दर्ज अपराध रिकार्ड पर वांछित एवं फरार आरोपितों की तलाश के लिए विशेष तलाशी अभियान चलाकर इनके ठिकाने की जानकारी प्राप्त कर अपराध में इनकी गिरफ्तारी के निर्देश एवं मार्गदर्शन दिया गया.उपरोक्त निर्देश एवं दिशा-निर्देश के अनुसार मानिकपुर थाना क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारी एवं कर्मचारी तकनीकी विश्लेषण के माध्यम से तथा गुप्त मुखबिरों से प्राप्त सूचना के आधार पर उपरोक्त अपराधों में मानिकपुर थाना के अभिलेखों पर वांछित आरोपी संजय गामा भारव्दाज (३९),निवासी-जे.बी.नगर,चकाला,अंधेरी पुर्व, मुंबई से हिरासत में लिया.पुलिस ने आगे की पड़ताल की.उस समय मृतक शख्स इस बात से नाराज था कि उक्त आरोपी को ५००० रुपये एडवांस नहीं दिया गया था।आरोपी ने मृत शख्स को अपने साथियों के साथ कार में डाल दिया और रुमाल से गला दबा कर हत्या कर दी.उसी रुमाल से शव के हाथ पीठ के पीछे बांधकर मौजे ससुनवघर गांव की सीमा में बकरी मंडी,बाजूस के सामने,मुंबई अहमदाबाद महामार् के पास मिट्टी के ढेर के पास फेंक दिए गए. पता चला है कि वह पिछले १४ सालों से बनारस, उत्तर प्रदेश और अंधेरी, मुंबई में अपना वजूद छुपा रहा है।

Scanned with CamScanner

# तंबाखूजन्य पदार्थ जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : खानिवडे टोलनाका येथे चारचाकी वाहनात लाखोंचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा मांडवी पोलिसांनी जप्त केला आहे.

३० एप्रिलला रात्री साडेदहाला मुंबई-अहमदाबाद महामार्गावर खानिवडे टोलनाक्याजवळ आरोपी जुनैद सरवैया व रवींद्र महाडिक ऊर्फ अनुज यांच्या ताब्यातील हॉंडा सिटी कारमध्ये केसरयुक्त विमल पानमसाला, रजनीगंधा पान मसाला असा शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य पदार्थांचा साठा व कार असा २ लाख ३० हजार १६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सोमवारी मांडवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

न्यूज Inbox

## वसई-विरार पालिकेकडून केले जातेय सुशोभीकरण



नवघर सनसिटी रोडवर उभारलेल्या सेल्फी पॉइंटचे उद्घाटन सोमवारी आयुक्त अनिलकुमार पवार, माजी महापौर नारायण मानकर यांच्या हस्ते झाले.

# नवघर सनसिटी रोडवर सेल्फी पॉइंटचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार महापालिकेतर्फे पालिका हद्दीत मोठ्या प्रमाणावर सुशोभीकरण सुरू आहे. कचरा टाकायच्या जागेवर सुंदर गार्डन तयार करण्यात येत आहेत. त्यातीलच नवघर येथील सनसिटी रोडवर उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉइंटचे उद्घाटन सोमवारी पालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार आणि माजी महापौर नारायण मानकर यांच्या हस्ते करण्यात आले.

पालिकेच्या हद्दीत कचरा टाकून जागा खराब होत होत्या. त्या ठिकाणी पालिका प्रशासनाने कल्पकतेने गार्डन आणि सेल्फी पॉइंट तयार केले आहेत. येथे बसण्यासाठी बेंच आणि सेल्फी घेण्यासाठी पुतळे उभारण्यात आले आहेत. वाहतूक पोलिस चौकीजवळ हा सेल्फी पॉइंट उभारण्यात आला आहे. त्याला लागून अभ्यासिका आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी कट्टाही उभारण्यात आला आहे. त्याचबरोबर सुंदर झाडेही लावली आहेत. याचे उद्घाटन महाराष्ट्र दिनी आयुक्त अनिलकुमार पवार, माजी महापौर नारायण मानकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर प्रकाश रॉड्रिग्स, माजी सभापती उमा पाटील, अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे, उपायुक्त नयना ससाने, बांधकाम कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड, प्रदीप पाचंगे, वाहतूक पोलिस निरीक्षक सागर इंगोले, सहायक आयुक्त नीलेश म्हात्रे, दयानंद मानकर उपस्थित होते.



Scanned with CamScanner